महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश.

---

क्रीडा मैदानाचा राष्ट्रीय व धार्मिक कारणासाठी वापर अनुज्ञेय करताना विचारात घ्यावयाच्या शर्ती व अटी.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक २० सप्टेंबर १९९७
क्रमांक टिपीबी ४३९७/निदेश १००६-प्र.क्र. १२२-९७ नंवि ११

ज्या अर्थी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना (सुधारणा) अध्यादेश १९९७ ((सन १९९७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४) अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, (यापुढे उक्त अधिनियम असा उल्लेख केलेला आहे.) ते कलम ३७ नंतर नवीन कलम ३७अ समाविष्ट करण्यात आलेले असून या नवीन कलमानुसार राज्य शासनास आणि नियोजन प्राधिकरणास कोणत्याही संघटनेला व्यक्तींच्या विश्वस्त किंवा संघाला या कलमात नमूद केलेल्या शर्ती व अटींवर कोणत्याही क्रीडांगणाचा किंवा त्याच्या भागाचा वापर विहित कालावधीसाठी स्वातंत्र्य दिन प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन आणि त्या प्रकारच्या राष्ट्रीय महत्वाच्या प्रसंगी व राष्ट्रीय महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथीच्या प्रसंगी आयोजित करण्यात येणाऱ्या समारंभासाठी आणि धार्मिक समारंभासाठी करण्याची परवानगी देता येते.

आणि ज्या अर्थी उक्त अधिनियमाचे सदर कलम ३७ अ ची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी अशा क्रीडांगणाचा धार्मिक व राष्ट्रीय समारंभासाठी उपयोग अनुज्ञेय करताना काही स्वयंस्पष्ट शर्ती व अटी समाविष्ट करणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत आहे.

आणि आता त्या अर्थी उक्त अधिनियमाचे उपकलम (१) कलम १५४ व कलम ३७ अ चे तरतुदीनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करुन राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणास खालील प्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

निदेश.

एक :- उक्त अधिनियमाचे कलम ३७ अ नुसार क्रीडांगणाच्या धार्मिक राष्ट्रीय समारंभासाठी वापर अनुज्ञेय करताना खालील शर्ती - अटींचे पालन करण्यात यावे.

१) क्रीडांगणाचा वाणिज्य वापरासाठी उपयोग अनुज्ञेय राहणार नाही.

२) कलम ३७ अ मध्ये नमूद केलेल्या धार्मिक संस्थांचे धार्मिक समारंभास अशा समारंभावर करण्यात आलेल्या खर्चांचा पुर्तता करण्यासाठी नाममात्र तिकीट दराने प्रवेश फी घेण्याची मुभा करण्यास अनुमती देण्यात येईल.

दि ६/१२/९७ पाठविले

पान दोन पहा......

कनिष्ठ लिपिक

३) या अनुषंगाने सर्व संबंधित नियम, नियमावली, आदेश न्यायालयाचे आदेश ज्या मध्ये मुंबई पोलीस अधिनियमान्वये जारी केलेल्या आदेशांचाही समावेश आहे त्याचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

४) लाऊड स्पीकरचा वापर रात्री ११-२० नंतर कोणत्याही परिस्थितीमध्ये अनुज्ञेय होणार नाही.

टीप : उपरोक्त निर्देश हे तात्काळ अंमलात आणण्यात येत आहेत.

महाराष्ट्र शासनाचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

सही. के. नलिनाक्षन
शासनाचे प्रधान सचिव.

-०-

क्रमांक महसूल-कायदा) सन २-४ जमिन (२)
कावि १८८१
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
रत्नागिरी २३-११-१९९७.

प्रति